मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» मंगळवार दि. 22 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# अजितदादांनी शब्द फिरवला..

## आता आम्ही दिवाळीपूर्वी चिंचवड महायुतीत बंडाचा बॉम्ब फोडणार : नाराज राष्ट्रवादीने दिवाळीपूर्वी महायुतीत बंडाचे फटाके फोडण्याचा ठराव

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजितदादांनी शब्द फिरवला.. असं म्हणत चिंचवडच्या समर्थकांनीचं थेट अजित पवारांना घरचा आहेर दिला आहे. चिंचवड विधानसभेत महायुतीने भाजपच्या शंकर जगतापांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादीने काही तासांतच बैठक बोलावत थेट अजित पवारांबाबत नाराजीचा सूर आळवला. आणि दिवाळीपूर्वी महायुतीत बंडाचे फटाके फोडण्याचा ठराव केला आहे.

काहीही झालं तरी आम्हाला भाजपचा प्रचार करायचा नाही, त्यामुळं महाविकास आघाडी आमच्यातील ज्याला उमेदवारी देईल, आम्ही त्यांचाच प्रचार



करू. अशी बंडाची भूमिका अजित पवारांच्या समर्थकांनी घेतली आहे. या बैठकीत नाना काटे, प्रशांत शितोळे, मयूर कलाटे या इच्छुक उमेदवारांसह माजी नगरसेवक विनोद नढे, संतोष कोकणे, दिलीप काळे, चंद्रकांत तापकीर, तानाजी जवळकर, श्याम जगताप, शिरीष काळे, प्रशांत सपकाळ, बापू कातळे या पदाधिकाऱ्यांनी दोन दिवसांत पुढची भूमिका जाहीर करण्याचा निर्णय एकमुखाने घेतला आहे.

आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील या नेत्यांनी ठराव केल्याप्रमाणे खरंच बंड करणार की त्याचा फटका महायुतीला बसू नये म्हणून अजित पवार या नेत्यांचे बंड थंड करणार हे पाहणे देखील तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करा

## चिंचवड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरी मतदानाचा टक्का अधिकाधिक वाढविण्यासाठी स्वीपच्या माध्यमातून प्रयत्न सुरु असून प्रसारमाध्यमांनी देखील याबाबत पुढाकार घेऊन जनजागृती करावी तसेच मतदारांनी आपला संविधानिक हक्क बजावण्यासाठी उत्स्फुर्तपणे मतदान करून इतर पात्र मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २०५ चिंचवड विधानसभा मतदासंघातील निवडणुक कामकाजाबाबत माहिती देण्यासाठी थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रिय कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील बापूजी बुवा सभागृहामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी माहिती देताना अनिल पवार बोलत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, किशोर ननवरे,निवडणूक कार्यालयातील अधिकारी यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाद्वारे आदर्श आचार संहिता लागू करण्यात आली आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्या दिवसापासून उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र भरण्यास सुरुवात होणार असून २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत उमेदवार नामनिर्देशनपत्र दाखल करू शकतात. त्यानंतर ३० ऑक्टोबर रोजी या नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार आहे. ४ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस असणार आहे. उमेदवार निश्चित झाल्यानंतर मतदान २० नोव्हेंबर तर मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी प्रसारमाध्यमांना दिली.



### पोलीस प्रशासनासोबत बैठक..

» २०५ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनासह विविध यंत्रणांनी समन्वय ठेऊन कामकाज करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिल्या.विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने तसेच आवश्यक पोलीस यंत्रणेच्या आराखड्याबाबत चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी आढावा घेतला.

### राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न..

» निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे. आदर्श आचारसंहितेचे भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले.

# पथविक्रेता समिती निवडणुकीच्या रिंगणात 29 उमेदवार

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पथविक्रता समिती निवडणकीचा कार्यक्रम जाहीर झाला



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पथविक्रता समिती निवडणकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, उद्या (दि.20) या समितीच्या एकूण आठ जागांकरिता गुप्त पद्धतीने मतदान प्रक्रिया राबविली जाणार आहे. अनेक पुढाऱ्यांच्या चार पॅनेलस काही अपक्ष असे एकून 29 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

सर्वसाधारण पुरूष प्रवर्गाच्या एकूण 2 जागांकरिता सर्वाधिक एकूण दहा उमेदवार आपले नशिब आजमवत आहेत. याशिवाय सर्वसाधारण महिला राखीव प्रवर्गाची एक जागा व उसूचित जाती राखीव प्रवर्गाकरिता प्रत्येकी 5 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत.

याशिवाय अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व इतर मागास प्रवर्गाच्या प्रत्येकी 1 राखीव जागेकरिता प्रत्येकी 2 उमेदवार रिंगणात आहेत. तर दिव्यांग प्रवर्गातील महिला राखीव पदाकरिता एकून तीन महिलांमध्ये लढत होणार आहे.

एकता पॅनेलचे एकूण पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामध्ये सुरेश मारुती कर्डिले,गिरीष विलास बेंद्रे, कांचन महेश मांढरे, उत्तम रंगा सकटे व सारिका बाबुसिंग राजपूत या उमेदवारांचा समावेश आहे.

# विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे वाढणार!

## अभ्यासक्रमात मोठा बदल; अभ्यासक्रमात तीन विषयांची भर; शेती, नळ दुरुस्ती, बागकाम, सुतारकामाचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराच्या वाढत्या ओझ्यावरून कायमच प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीवर असणाऱ्या दप्तराचे ओझे कसे कमी होणार, याबाबत अनेकदा चर्चा करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरच्या ओझ्याचा प्रश्न अद्याप अनुत्तरित असताना आता तो कमी होण्याऐवजी आणखी वाढणार आहे. कारण नववी, दहावी अभ्यासक्रमाच्या सात विषयांत अतिरिक्त तीन विषयांची भर पडणार आहे. शेती, नळ दुरुस्ती, बागकाम, सुतारकाम या नव्या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

पालक, विद्यार्थी संघटनांसह स्वयंसेवी संस्थांच्या सर्वेक्षणातून अवजड दप्तरामुळे पाठदुखी, मणक्याचे गंभीर आजार असे निष्कर्ष समोर आले होते. या संदर्भात राज्य सरकारच्या दरबारीसुद्धा हा प्रश्न मांडण्यात आला. पण अद्याप तरी या प्रश्नावर कोणताही तोडगा काढण्यात आलेला नाही. परंतु, आता विद्यार्थ्यांचे पाठीवरील ओझे कमी नाही तर वाढणार असल्याची माहिती समोर आली आहे. कारण लवकरच नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात मोठा बदल होणार असून यामुळे विद्यार्थ्यांना अधिकचा अभ्यास करावा लागणार आहे.

नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना सध्या तरी सात ते आठ विषयांचा अभ्यास करावा लागतो. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषा आणि त्या व्यतिरिक्त विज्ञान, गणित, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, शारीरिक शिक्षण इत्यादी विषय आहेत. पण आता यामध्ये व्यावसायिक शिक्षण, कला शिक्षण, अंतर्गत विद्या शाखा विषय यांचा समावेश करण्यात येणार आहे. त्याशिवाय स्काउट गाइडसुद्धा बंधनकारक असणार आहे. ज्यामुळे तब्बल १४ ते १५ विषय विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता असणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझ्यासोबतच अभ्यासाचे ओझेदेखील वाढणार आहे. या व्यतिरिक्त विषयांमुळे शाळांच्या वेळाही वाढवण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेबसाइटवर याबाबतची ब्लू प्रिंट देण्यात आली आहे.



### काय होणार बदल ?

- नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांचा समावेश सक्तीचा केला आहे. शाळांकडून सूचना आल्यानंतरच अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.
- व्यावसायिक शिक्षणामध्ये नववीसाठी विद्यार्थ्यांना शेती, नळ दुरुस्ती, सौंदर्य या व्यवसायांची ओळख करून देण्यात येणार आहे.
- दहावीला बागकाम, सुतारकाम परिचय यासारख्या व्यवसायांची माहिती देण्यात आली आहे.
- कला शिक्षणातून दृश्यकला, नाट्य, संगीत, नृत्य, लोककला हे विषय शिकवण्यात येणार आहेत.

> “ नवीन कौशल्याधारित विषयांचा समावेश केला या निर्णयाचे स्वागत करतो. परंतु विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कसे कमी होणार, याचा गांभीर्याने कधी विचार होणार आहे? त्यासाठी आणखी किती वर्षे वाट पाहावी लागणार आहे? विविध सर्वेक्षणातून विद्यार्थ्यांना पाठदुखी, मान आणि मणक्याच्या आजारांसह बौद्धिक ताणतणाव असे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यावर उपाय म्हणून दप्तरांचे ओझे कमी करण्याची शिफारस करण्यात आली होती. शाळेत स्वतंत्र कपाटात जुनी पुस्तके, घरी नवीन पुस्तके असे उपाय दिले होते. परंतु त्यावर कुठलाही धोरणात्मक निर्णय घेतला नाही.
>
> - हेरंब कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी.

> “ विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास करण्यासाठी आवश्यक ते बदल करण्याऐवजी मागणी नसताना शेती, नळ दुरुस्ती, सौंदर्य या व्यवसायांचा विषय अभ्यासक्रमात दिला आहे. त्यामुळे विनाकारण पाठीवरील ओझे वाढविले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी विविध उपाय सुचविले आहेत. त्यापैकी एकही उपाय अमलात आणला नाही.
>
> - आनंद रणधीर, पालक प्रतिनिधी आणि संस्थापक-अध्यक्ष, सम्यक फाउंडेशन महाराष्ट्र

# मतदानासाठी गृहनिर्माण संस्थांचा सहभाग महत्त्वाचा

## जिल्हाधिकारी डॉ. दिवसे : विशेष बैठका घेण्याच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थांमधील मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध उपक्रम राबवावेत.

सदस्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने विशेष सभा बोलावून सभासदांना मतदानाचे आवाहन करावे. असे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सांगितले.

जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रमांद्वारे मतदान जागृती करण्यात येत आहे. त्याअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मतदानाच्या तारखेचा उल्लेख असलेली निवडणूक विषयक भित्तीपत्रके संस्थेच्या दर्शनी भागात लावावीत. गृहनिर्माण संस्थांनी सभासदांना मतदार यादीत नाव शोधून द्यावीत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

मतदान जागृती उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गृहनिर्माण संस्थांमधील लेखा परीक्षकांच्या मदतीने सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आपापल्या मतदार संघाशी निगडीत



### जिल्हाधिकारी यांनी केलेले आवाहन

- मतदान चिठ्ठी पोहोचविण्यास केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना मदत करणे,
- पात्र मतदारांची यादी तयार करुन मतदानाच्या दिवशी सकाळपासून मतदान केलेल्या मतदारांची नोंद घेणे,
- वृद्ध व दिव्यांग सभासदांसाठी मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी शक्य असल्यास वाहनाची व्यवस्था करणे,
- दुपारपर्यंत मतदान न केलेल्या सभासदांच्या भेटी घेऊन मतदान करण्याबाबत प्रेरित करावे,
- मतदान केलेले सभासद व नवमतदारांना गुलाबपुष्प अथवा भेट वस्तू देऊन सोसायटीमधील विशेष सोहळ्यात गौरविण्यात यावे.

# नियोजनाचही अभाव : वाहतूक कोंडीचा “फेस्टिव्हल’

## बेशिस्त वाहनचालकांमुळे मध्यवर्ती भागांत प्रचंड वाहतूक कोंडी झाली

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांनी शहराच्या मध्यवर्ती भागांत शनिवारी गर्दी केली होती. मात्र, पार्किंगचा अभाव, अतिक्रमणे, नो पार्किंगमध्ये उभी केलेली वाहने आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे मध्यवर्ती भागांत प्रचंड वाहतूक कोंडी झाली.

यामुळे नागरिकांना खरेदीचा आनंद मात्र मनसोक्तपणे लुटता आला नाही. यामध्ये वाहतूक पोलिसांचे नियोजनही ढासळलेले दिसले.

खरेदीसाठी अनेकजण सहकुटूंब आल्याने चारचाकी वाहनांची संख्या मोठी होती. इतरवेळी दुचाकी पार्किंगसाठी मारामार असताना अचानक चारचाकी वाहने प्रचंड संख्येने लक्ष्मीरस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता येथे दाखल झाली.

पार्किंगची पुरेशी सोय नसल्याने अनेकांनी चालकांना गाडीत बसवून गाडी मुख्य रस्त्यावरच उभी केली. तर अनेक जणांनी दंडाची काळजी न करता दुकानाजवळच वाहने उभी करून खरेदीची संधी साधली होती.

यामुळे मुख्य लक्ष्मी रस्ता तर जाम झालाच; मात्र गल्लीबोळांतून मार्ग काढण्याच्या नादात अनेकांनी उलट्या दिशेने वाहने आणली. यामुळे सर्वच रस्ते जाम झाले. पुढे जाण्याच्या नादात कोणीच वाहनचालक मागे हटण्याचे नाव घेत नव्हते. यामुळे अनेक ठिकाणी वादावादीच्या घटनाही दिसल्या.

मागील काही वर्षांत महापालिका आणि वाहतूक पोलीस मिळून लक्ष्मी रस्त्यालगतच्या शाळा आणि संस्थांची मैदाने शनिवार व रविवार पार्किंगसाठी मोफत उपलब्ध करुन देत होते. तसेच अतिरिक्त मनुष्यबळही रस्त्यावर ठेवले जात होते.



# कालबाह्य वाहने भंगारात काढून इलेक्ट्रिक वाहने वापरणार

## प्रदूषण कमी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे पाऊल : महापालिकेकडे 51 इलेक्ट्रिक वाहने

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील प्रदूषण कमी व्हावे, तसेच, पर्यावरण संरक्षणासाठी महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना इलेक्ट्रिकवर चालणारी वाहने वापरण्यास सुरुवात केली आहे. तर कालबाह्य झालेली वाहने भंगारात काढण्यात येणार आहेत. पेट्रोल व डिझेलवरील वाहने वापरणे योग्य नसल्यास तसेच, मुदतबाह्य झालेली वाहने भंगारात काढण्याचा निर्णय घेतला आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुदतबाह्य आणि नादुरुस्त झालेली वाहने भंगारात काढली जात आहेत. त्या वाहनांची संख्या तब्बल २२८ इतकी आहे. त्यात स्वीपर मशिन, कॉम्पॅटर, टिप्पर, ट्रॉली, डिलिव्हरी व्हॅन, वॉटर टँकर, टँकर, डंपर, जीप, अग्निशमन बंब, सुमो, ॲम्बॅसेडर, आदींसह विविध चारचाकी व अजवड वाहनांचा समावेश आहे. शहराचे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने हे पाऊल उचलले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात वाढत असलेले वायू व ध्वनिप्रदूषण करण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्यानुसार महापालिकेने पेट्रोल व डिझेल इंधनावर चालणारी मुदतबाह्य वाहने भंगारात काढण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्या मालकीची लहान व मोठी अशी एकूण ४६८ वाहने आहेत. त्यापैकी कोट्यवधी रुपये किमतीची तब्बल २२८ वाहनांना १५ वर्षे पूर्ण झाली असल्याने ती सर्व वाहने भंगारात काढली जाणार आहेत. त्याबाबत एमएसटीसीने कार्यवाही सुरू केली. त्यातील ४९ वाहनांचा लिलावही करण्यात आला आहे. ती वाहने भंगारात विकून त्यांची रक्कम महापालिकेकडे जमा केली जाणार आहे. दरम्यान, उर्वरित अनेक वाहनेही मुदतबाह्य होण्याच्या वाटेवर आहेत. त्यांची क्षमता तपासण्याचे काम सुरू आहे. मात्र, १५ वर्षे मुदत झाली असल्यास आरटीओच्या नियमानुसार ती सर्व वाहनेही भंगारात काढली जाणार आहेत.

### महापालिकेकडे 51 इलेक्ट्रिक वाहने

» महापालिकेच्या वतीने पेट्रोल व डिझेल इंधनावरील वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे. महापालिकेकडून इलेक्ट्रिक वाहनांवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. नव्याने खरेदी करण्यात येणारी तसेच, भाडेतत्त्वावर केवळ इलेक्ट्रिक वाहने घेतली जात आहेत. त्यामुळे ती वाहने वापरण्यात येत आहेत. ही वाहने भाडेतत्त्वावर घेण्यात आली आहेत. त्या वाहनांची संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. कमी वजनाचे साहित्य वाहतुकीसाठी तसेच, शववाहिनीसाठीही इलेक्ट्रिक वाहने वापरण्यात येणार आहेत, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ही वाहने झाली कालबाह्य

टोयोटा करोला ३, टाटा मंझा ८, टाटा इंडिका ३, अम्बॅसेडर ४, टाटा सुमो १७, टाटा मोबिलिओ ४, मारुती इस्टीम १, महिंद्रा जीप ३, टेम्पो ट्रॅक्स १, मारुती व्हॅन १, ॲम्ब्युलन्स १, अग्निशमन बंब ४, हैड्रोलिक लॅडर ६, डंपर प्लेसर १, मैला टँकर १३, टाटा एसीई लोडबॉडी ४, टाटा ४०७ लोडबॉडी २, टाटा ६०८ लोडबॉडी ४, टाटा ७०९ लोडबॉडी ५, टाटा १२१० लोडबॉडी ४, वॉटर टँकर १२, फिरते शौचालय ३१, रोडरोलर १, ट्रॅक्टर ३, ट्रॅक्टर ट्रॉली ५, जेसीबी ३, डॉग स्कॉड ३, डिलिव्हरी व्हॅन १, पोलीस व्हॅन (अतिक्रमण व्हॅन) ४, पॉवर टिलर ट्रॉली १, ट्री कटिंग १, टिप्पर ६, एमजीओ हॉपर रिक्षा ३, कॉम्पॅक्टर २२, स्वीपर मशिन ४, मलजेट ४, नाला क्लिनिंग ४, टाटा एसीई हॉपर ३०, एकूण २८८ वाहने.

# शहरात हजारांहून अधिक फटाक्यांची दुकाने

## अनधिकृत फटाक्यांच्या दुकानांना महापालिका प्रशासन आणि पोलिसांकडून अभय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात गल्लोगल्ली फटाक्यांची दुकाने लागतात. शहरात एक हजारांहून अधिक फटाक्याच्या दुकानांची संख्या आहे. मात्र परवानगी घेतलेल्या अधिकृत फटाक्यांच्या दुकानांची संख्या पाऊणशेच्या आताच आहे. महापालिका प्रशासन आणि पोलीस यांचे या दुकानांना अभय असल्याचे दिसून येते. फटाके विक्रीच्या व्यावसायात गुंतवणुकीच्या जवळपास तिप्पट नफा अवघ्या काही दिवसांमध्ये मिळत असल्याने अनेकजण या व्यावसयाकडे वळत आहेत.



मात्र फटाके विक्री करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या अनेक दुकानदार घेतच नाही. त्यामुळे या फटाके विक्री करणाऱ्या दुकानदारांकडून पिंपरी-चिंचवडकरांच्या जिवाशी खेळ सुरू आहे. जर महापालिका किंवा पोलीस कारवाईचे निमित्त करून आलेच तर त्यांच्या हातावर शे-पाचशे रुपये टिकवले जातात. त्यामुळे महापालिका आणि पोलीसही अशा दुकानांकडे दुर्लक्ष करतात. पिंपरी-चिंचवडकरांच्या सुदैवाने शहरात अद्याप कोणत्याही फटाक्याच्या दुकानाला आग लागलेली नाही. मात्र भविष्यातही अशी घटना घडणार नाही, हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही. मात्र भविष्यात नियमांकडे दुर्लक्ष केल्यास काही घटना घडली तर त्यात किती जिवितहाणी किंवा वित्तहाणी होईल, हे सांगता येत नाही. असे असतानाही कोणतीच खबरदारी न घेता गल्लोगल्ली फटाके विक्री जोमात असते.

शहरातील गर्दीच्या ठिकाणी अथवा निवासी इमारतीच्या खाली फटाक्यांची दुकाने थाटली जातात. अशी दुकाने टाकताना शासनाने दिलेल्या नियमांचे पालन केले जात नाही. या दुकानांवर कारवाई करण्याचे अधिकारी महापालिकेचा अतिक्रमण विभाग आणि पोलिसांना असते. सर्व नियमांचे पालन झाले असल्यास अग्निशामक दल या दुकानांना केवळ ना-हरकत प्रमाणपत्र देते. मात्र अशा घटना घडल्यावर केवळ अग्निशामक दलास जबाबदार धरले जाते.

### यंदा आतापर्यंत 77 अर्जांचे वितरण

» फटाके विक्री करण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी घेण्यासाठी आतापर्यंत ७७ अर्ज दुकानदारांनी घेतले आहेत. मात्र यापैकी अनेकांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करता येत नसल्याने ते अनधिकृत दुकाने थाटतात. तसेच दुकानाचे आरसीसी बांधकाम आहे का, त्यास लोखंडी शटर आहे का, स्टॉल असल्यास त्याचे क्षेत्रफळ किती, बाजूच्या दोन्ही दुकानदारांची नावे व त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच दुकान मुख्य रस्त्यालगत आहे की गल्लीत आहे याची सर्व माहिती अग्निशामक दलास देणे बंधनकारक आहे.

### कोणती कागदपत्रे आवश्यक?


» मागील वर्षाचा ना-हरकत दाखला प्रत
» मागील वर्षाचा पोलीस परवाना
» यंदाची मिळकतकर भरणा पावती
» दुकानाच्या जागेचा कच्चा नकाशा
» जागा मालकाचा ना-हरकत दाखला
» दुकान असलेल्या सोसायटीचा ना-हरकत दाखला
» अग्निशामक साधने खरेदीचा दाखला

# एकाही अभ्यासिकेचे फायर ऑडिट नाही

## स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात : महापालिका आयुक्तांनी दिले तपासणीचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

अधिकारी होण्याचे स्वप्न घेऊन आलेले लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासिकेत २४ तासापैकी किमान १५ तास बसून अभ्यास करत असतात. मात्र त्यांची सुरक्षितता धोक्यात असल्याचे धक्कादायक वास्तव गांजवे चौकातील अभ्यासिकेला लागलेल्या आगीच्या निमित्ताने समोर आले आहे.



पुण्यातील गांजवे चौकातील ध्रुवतारा या अभ्यासिका शनिवारी (दि. १९) लागलेल्या आगीत जळून खाक झाली. शहरात २५० हून अभ्यासिका आहेत. या अभ्यासिकेत लाखो विद्यार्थी अभ्यास करत असतात. या अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. शहरातील एकाही अभ्यासिकेने अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) करण्याचा साधा एकही अर्ज केला नसल्याची माहिती पुणे महापालिका आणि अग्निशमन दलाच्या प्रशासनाने 'सीविक मिरर'ला दिली. यावरून शहरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात असल्याचे स्पष्ट होत आहे.

दिल्लीत नागरी सेवा स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेणाऱ्या शिकवणी वर्गांचे (कोचिंग क्लासेस) केंद्र असलेल्या जुन्या राजेंद्रनगर भागातील राऊज आयएएस स्टडी सेंटरमध्ये तळघरातील ग्रंथालयामध्ये पाणी साचल्याने दोन विद्यार्थिनी आणि एका विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना जुलै महिन्यात घडली होती. यावरून अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यानंतर दिल्लीसह देशातील प्रत्येक अभ्यासिकेने काय काय उपाययोजना केल्या आहेत? आपत्तीजनक घटना घडल्यास विद्यार्थी कसे सुरक्षित राहतील, याबाबत शासनाने धोरण तयार करण्याची आवश्यकता होती. मात्र शासनाच्या उदासीन कारभारामुळे विद्यार्थी जीव धोक्यात घालून अभ्यास करत आहेत.

पुणे शहराला विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पुण्यात लाखो विद्यार्थी शिक्षणाच्या निमित्ताने राज्यातूनच नव्हे तर देशाभरासह परदेशातून येतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी सरकारने कडक पावले उचलण्याचे धोरण आखण्याची गरज असल्याचे मत आता पुणेकरांकडून उपस्थित केले जाऊ लागले आहे. तर दुसरीकडे हेच विद्यार्थी भावी अधिकारी होणार आहेत. त्यांनीच स्वत: अभ्यासिकेत प्रवेश घेण्यापूर्वी आपण या ठिकाणी सुरक्षित असणार आहोत का, याची तपासणी करणे गरजेचे असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

या आगीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील सर्व लहान-मोठ्या अभ्यासिकांचे फायर ऑडिट होणे गरजेचे आहे. मात्र, पालिका प्रशासन त्यात अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. महापालिकेच्या या उदासीन कारभार संताप व्यक्त करत युवासेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी शहरातील सर्वच अभ्यासिकांचे फायर ऑडिट करण्याची मागणी पुणे महापालिकेकडे केली आहे. तसेच युवासेनेकडून भरारी पथके नियुक्त करून अभ्यासिकेंना भेटी देत फायर ऑडिट करुन अहवाल महापालिकेला सादर केला जाणार आहे, असे यादव यांनी सांगितले.

### महापालिका प्रशासनाने काय करायला हवे?

- » शहरातील अभ्यासिकांची नोंदणी करण्यासाठी एक धोरण तयार करावे
- » केवळ शॉप ॲक्ट नोंदणी करून परवानगी देऊ नये.
- » महापालिकेने अभ्यासिकांसाठी वेगळे निकष तयार करावे.
- » फायर ऑडिटसह प्रत्यक्ष अभ्यासिकेत काय उपाय जना केल्या आहेत, याची तपासणी करावी.
- » जुने वाडे, इमारतीमधील अभ्यासिका विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी योग्य आहे का, त्याची पाहणी करावी.

> शहरातील सर्वच अभ्यासिकांचे फायर ऑडिट करण्याचे आदेश महापालिका प्रशासनाला दिले आहेत. प्रत्येक विभागाने दिलेल्या सूचनांनुसार अभ्यासिकांना उपाययोजना करणे बंधनकारक राहणार आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता महत्त्वाची आहे.
>
> - डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.

> शहरातील प्रत्येक इमारतीचे फायर ऑडिट करण्याचे बंधन शासनाने घातले आहे. परंतु त्याचे पालन होताना दिसून येत नाही. इमारतीचा नेमका कशासाठी उपयोग करायचा आहे, ही माहिती द्यावी लागते, त्यासोबत फायर ऑडिट करावेच लागते. शासनाच्या अधिकृत एजन्सी नेमलेल्या आहेत. त्यांच्याकडून फायर ऑडिट करून घ्यावे लागते. मात्र शहरातील एकाही अभ्यासिकेने फायर ऑडिट केलेले नाही. फायर ऑडिट करून घेण्याची जबाबदारी ही संबंधित मालकाची असते.
>
> - रमेश गांगड, साहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी.

# परिवर्तन महाशक्तीचे विधानसभेसाठी 8 उमेदवार जाहीर

## बच्चू कडू, संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी यांची पत्रकार परिषदेत घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

महापरिवर्तन महाशक्तीच्या वतीनं पुण्यात राज्यातील दहा जागांची यादी जाहीर केली. या यादीत प्रहार जनशक्तीचे बच्चु कडू यांचा समावेश आहे. पुण्यात महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे संभाजीराजे, प्रहार जनशक्तीचे बच्चु कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेत आपल्या यादीची घोषणा केली. यावेळी स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस धनंजय जाधव, प्रहारचे अनिल चौधरी आदी उपस्थित होते.

यावेळी संभाजीराजे म्हणाले की, महाराष्ट्रात निवडणुकांचे वातावरण तापू लागलं आहे. आज महापरिवर्तन महाशक्तीची बैठक झाली. आम्हाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आमच्याकडे येणाऱ्या विस्थापितांची मोठी यादी आहे. पण प्रस्थापित देखील उमेदवारीसाठी मोठ्या संख्येने आम्हाला संपर्क करत आहेत.

राजू शेट्टी म्हणाले की, परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून एक सक्षम आणि दणकट पर्याय आम्ही महाराष्ट्रातील जनतेसमोर ठेवत आहे. राज्यात जे राजकारण सुरू आहे, ते टोळी युद्ध सुरू आहे. आम्हाला महाराष्ट्र स्वच्छ करायचा आहे, साफ करायचा आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राची राजकीय प्रगल्भता आणि संस्कृती लयाला गेली आहे. ती पुन्हा प्रस्थापित करायची आहे, असा निर्धार परिवर्तन महाशक्तिने केला आहे. बारामतीतही आम्ही उमेदवार देणार आहोत. शिरोळ आणि मिरज या दोन मतदार संघात इच्छुकांची संख्या जास्त असल्याने तिथल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करुन नावे जाहीर केली जातील. स्वच्छ चारित्र्य, आणि स्वच्छ हात ही आमची उमेदवारी देण्याची अट आहे.

बच्चु कडू म्हणाले की, इतर पक्षांसारख्या आम्ही वेगवेगळ्या यादी जाहीर करत नाहीत. आम्ही सर्वजण एकत्र येऊन यादी जाहीर करत आहोत. राजकीय संस्कृती लयाला गेली आहे. ती पुन्हा रुजवायची आहे. म्हणून एक सक्षम पर्याय म्हणून आम्ही एकत्रित आलो आहोत.



### उमेदवारांची नावे अशी -

1. ओमप्रकाश उर्फ बच्चू बा. कडू : ४२ - अचलपूर
2. अनिल छबिलदास चौधरी : ११ - रावेर यावल
3. गणेश रमेश निंबाळकर : ११८ - चांदवड
4. सुभाष साबणे : ९० - देगलूर बिलोली (SC)
5. अंकुश सखाराम कदम : १५० - ऐरोली
6. माधव दादाराव देवसरकर : ८४ - हदगाव हिमायतनगर
7. गोविंदराव सयाजीराव भवर : ९४ - हिंगोली
8. वामनराव चटप : ७० - राजुरा